बुंदीलेच्या प्रचारात झेंड्यापासून ते दांड्यापर्यंत सर्व काही भाजपचं

नवनित राणा गावागावात फिरुन करताहेत प्रचार | अनेक सभांमध्ये अभिजीत अडसूळांना पाडण्याचे आवाहन

महासागर प्रतिनिधी

अमरावती,(दि.14)- युध्दात आणि प्रेमात सर्व काही क्षम्य असते, असे म्हटले जाते. परंतू विधानसभा निवडणुकीत महायुतीमधील मित्र पक्ष भाजप ला सर्वकाही क्षम्य असल्याचे दिसत आहे. लोकसभेचा सूड उगविण्याकरिता राणा दाम्पत्याने दर्यापूरात महायुतीचे उमेदवार शिंदे गट शिवसेनेचे अभिजीत अडसूळ यांना घरचा आहेर नाही, तर घरचा नारळ, दुपटा देण्याची तयारी केली आहे. नावापूरती युवा स्वाभिमानच्या उमेदवारीवर उभे केलेले माजी आमदार रमेश बुंदीले यांच्या प्रचारात झेंड्यापासून

ते दांड्यापर्यंत सर्व काही भाजपचे वापरले जात आहे. इतकेच नव्हे तर भाजप नेत्या नवनित राणा खुद्द गावागावात फिरुन रमेश बुंदीले यांचा प्रचार करित सभा घेवून अडसूळांना पाडण्याचे आवाहन जनतेला करित आहेत.

लोकसभेमध्ये महायुती मधील मित्र पक्षाने युती धर्म पाडावा, याकरिता आग्रही असलेले रवी राणा आणि नवनित राणा विधानसभेमध्ये मात्र थेट मित्र पक्षाच्या विरोधात काम करताना दिसत आहेत. अमरावती विधानसभा मतदारसंघात सुलभा खोडके विरुध्द जगदीश गुप्ता असे आव्हान उभे करत गुप्तांना विजयी करा, असा छुपा प्रचार करित आहेत. तर दर्यापूरात अभिजीत अडसूळांविरुध्द रमेश बुंदीले यांना उभे करुन बुंदीले हे भाजपचेच उमेदवार आहे, असे भासवले जात आहे. फक्त या ठिकाणी 'कमळ' ऐवजी 'पाना' या चिन्हाला मत देण्याचे आवाहन केले जात आहे. प्रचार रॅलीमध्ये भाजपचे झेंडे, प्रचार सभेमध्ये भाजपचे होर्डींग, गळ्यात युवा स्वाभिमान आणि भाजप च्या पट्टया लावून प्रचार केला जात आहे. त्यामूळे अचानक पिछाडीवर गेलेले अभिजीत अडसूळ मात्र हतबल होवून सर्वकाही पाहत आहेत. एका सभेमध्ये मुख्यमंत्र्यांनी इशारा दिल्यावरही राणा दाम्पत्याचा हा प्रकार थांबायचे नाव घेत नाही, तर जिल्हा भाजप आत मधून 'लगे रहो' असे पुशअप करताना दिसत आहे.

तिवसा मतदारसंघात वन टू वन लढत!

विकास करणाऱ्या व्यक्तीलाच मतदान-जनता

काय म्हणतो ग्राउंड रिपोर्ट

महासागर प्रतिनिधी

अमरावती,(दि.14) - तिवसा मतदार संघात काँग्रेस विरुध्द भाजप अशी लढत पहायला मिळत आहे. ही 'वन टू वन' अशी लढत जरी असली, तरी जातपाती च्या, धर्माच्या नावावर मत मागणाऱ्यांपेक्षा विकासाच्या नावावर मत मागणाऱ्यांच मतदान करणार असल्याचे मत मतदारसंघातील अधिकतर जनतेचे आहे. गुरुवारी तिवसा मतदारसंघातील काही गावांमध्ये 'दै.महासागर' ने ग्राउंड रिपोर्टींग करित या निवडणूकीत जनतेचा कौल कुणाला याचा आढावा घेतला. आमच्या प्रतिनिधीने तिवसा मतदारसंघातील गोराळा, तळेगाव, धामणगाव, शिरखेड, लिहीदा, लेहेगाव, नेरपिंगळाई आदी गावांचा फेरफटका मारुन प्रत्येक गावातील दोन व्यक्तींकडून आगामी निवडणूकी संदर्भात त्यांचे मत जाणून घेतले. अनेकांनी गावातील काही समस्यांबाबत तक्रारी केल्या, तर काहींनी मतदारसंघातील विकासाबाबत चर्चा केली. महाविकास आघाडी सरकारच्या काळात झालेला विकास हा तिवसा मतदारसंघातील गावागावांचे भाग्य उजळणारा असल्याचे काहींचे म्हणणे होते. नाव न प्रकाशित करण्याच्या अटीवर एका व्यक्तीने

सांगितले की, मी भाजप चा कार्यकर्ता आहे. परंतू महाविकास आघाडीचे सरकारमध्ये येथील विद्यमान आमदार यशोमती ठाकूर मंत्री असताना त्यांनी तिवसा मतदारसंघात प्रचंड निधी आणला. ग्रामपंचायत कार्यालयांपासून ते गावातील मंदिरांपर्यंत त्यांनी सर्व घटकाचा विकास केला. आता सत्तेतील व्यक्ती त्यांच्या विरोधात उभा आहे. जनतेचे मतपरिवर्तन करण्याकरिता मोठ्या प्रमाणात पैसा खर्च केला जात आहे. परंतू जनता लोकसभा निवडणूकीपासून चांगलीच हुशार झाली आहे. जातीपातीच्या राजकारणात न पडता विकास करणाऱ्यांच्या पाठीशी उभी राहते, हे दाखवून दिले आहे. या निवडणूकीतही हेच चित्र पहायला मिळू शकते, अशी शक्यता मतदारराजाने यावेळी व्यक्त केली.

माथेफिरुने आई, मुलाला पेटविले

महिलेचा मृत्यू, मुलगा गंभीर | आरोपीने स्वतःही घेतले विष

महासागर प्रतिनिधी

धामणगाव रेल्वे,(दि.14) - अनैतिक संबंधाच्या कारणावरून शेजारी असलेल्या घरात जाऊन एका महिलेच्या व मुलाच्या अंगावर पेट्रोल टाकून पेटविल्याची धक्कादायक घटना 13 नोव्हेंबर रोजी मध्यरात्री तालुक्यातील पिंपळखुटा येथे घडली आहे. सदर घटनेत आईचा होरपळून मृत्यू झाला असून मुलगा जखमी झाला आहे. यातील आरोपीने सुद्धा विष प्राशन करून स्वत:ला संपवण्याचा प्रयत्न केला आहे.

मंगरूळ दस्तगीर पोलिसांनी दिलेल्या माहितीवरून तालुक्यातील पिंपळखुटा येथे राहणारा मंगेश शामराव मेश्राम (40) याला पत्नीचे शेजारी राहत असलेल्या नितीन जानराव मेश्राम (28) हिच्याशी प्रेमसबंध असल्याचा संशय होता. अनैतिक संबंधाच्या कारणावरून मंगेश मेश्राम हा बुधवारी मध्यरात्री साडेबारा वाजताचे दरम्यान शेजारी असलेल्या नितीन मेश्राम याचे घराचे लोखंडी फाटक ओलांडून आत शिरला. घराला असलेल्या लोखंडी खिडकी जवळ उभा राहून त्याने नितीनला शिवीगाळ करून बोलावले. शिवीगाळ ऐकताच

आतल्या खोलीत झोपी गेलेले त्याची आई नंदा जानराव मेश्राम व नितीन जानराव मेश्राम हे दोघेही खिडकी जवळ येताच बाहेर उभा असलेल्या मंगेश मेश्राम याने त्या दोघांवरही पेट्रोल सारखे द्रव्य फेकले व क्षणात घरासह दोघांना पेटवले. घराबाहेर असलेली दुचाकी सुद्धा मंगेशने पेटवली होती. यावेळी आगीचा जोरदार भडका उडाल्याने गावकरी सुद्धा जागे झाले. या घटनेची माहिती मिळतात मंगरूळ दस्तगीर पोलीस स्टेशनचे ठाणेदार गौतम इंगळे, पोलीस उपनिरीक्षक जीवन लांडगे,पोलीस कर्मचारी सहदेव राठोड, प्रभू राठोड व चालक मयूर सह पोलीस पथक घटनास्थळी पोहचले.दरम्यान मंगेश मेश्राम याने सुद्धा विष प्राशन केल्याची माहिती मिळाली. नितीन मेश्राम व नंदा मेश्राम या दोघांनाही उपचाराकरिता शहरातील वैद्यकीय रुग्णालयात आणले असता दोघांचीही प्रकृती चिंताजनक असल्याने यवतमाळ हलविण्यात आले. मात्र अत्याधिक आगेत होरपळल्याने नंदा मेश्राम यांचा वाटतच मृत्यू झाला, तर नितीन मेश्राम याला यवतमाळ जिल्हा सामान्य रुग्णालयातून नागपूर येथे हलविण्यात आले आहे. यातील आरोपी मंगेश शामराव मेश्राम याला सुद्धा नातेवाईकांनी शहरातील ग्रामीण रुग्णालय येथे आणले असता त्याला पुढील उपचारासाठी अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालय येथे हलविण्यात आले आहे. सदर घटनेने सर्वत्र खळबळ उडाली आहे.

सात किलो सोने, 17 लाखांची चांदी जप्त

नागपुरी गेट हद्दीत कारवाई

महासागर प्रतिनिधी

अमरावती (दि. 14)- नागपूरी गेट पोलिसांनी दर्यापूर आणि खामगावच्या दिशेने जाणार्या एका वाहनातून 5 कोटींहून अधिक किमतीचे 7 किलो सोने आणि चांदी जप्त केली आहे. गुरुवारी सायंकाळी नागपुरीगेट हद्दीत ही कारवाई करण्यात आली. हा माल कुण्यातरी व्यापार्याला देण्यासाठी जात असल्याची माहिती पोलीस सूत्रांकडून मिळाली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिस विभाग व निवडणूक विभागाकडून राज्य व जिल्ह्यांच्या सीमा व इतर ठिकाणी वाहनांची तपासणी सुरू आहे. गुरुवारी रात्री नागपुरीगेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नाकाबंदीवर पोलिसांकडून वाहनांची तपासणी सुरू होती. त्यानंतर एका वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात सोने-चांदी असल्याचे दिसून आले. तपासात 7 किलोपेक्षा जास्त किंमतीचे सोने आणि चांदी असा एकूण 5 कोटी रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे. सोन्या-चांदीची डिलिव्हरी झाल्याची माहिती चालकाने दिली आहे. दर्यापूर आणि खामगावला सोने-चांदी पोहोचवणार होते. सध्या पोलिसांनी हा माल जप्त केला असून संबंधित लोकांकडून सोन्या-चांदीची कागदपत्रे आणि पावत्या तपासत आहेत. वृत्त लिहेपर्यंत नागपुरी गेट पोलिसांचा तपास सुरू होता.

स्पेशल स्कॉडने पकडली 3.11 कोटींची रोख

अमरावती - पोलिस आयुक्त यांच्या स्पेशल स्कॉडने गुरूवारी दुपारी सलग तीन ठिकाणी कारवाई करून, तब्बल 3 कोटी 11 लाखांची रोख रक्कम जप्त केली. परंतू रोख रक्कमेच्या दस्तावेज पडताळणीनंतर ती परत सुध्दा करण्यात आली. अमरावती विधानसभा मतदार संघात ही कारवाई करण्यात आली होती. स्पेशल स्कॉडचे पोलिस निरिक्षक आसाराम चोरमले हे आपल्या पथकासह पेट्रोलिंग करत असताना साबणपुरा भागातून त्यांनी इंडिया नंबर वन या एटीएम कंपनीची कॅश वाहून नेणारे वाहनातून रक्कम जप्त केली.

आठवडी बाजारात दिला मतदानाचा संदेश

विद्यार्थ्यांची मतदार जनजागृती | चांदुर रेल्वे स्वीपचा उपक्रम

महासागर प्रतिनिधी

चांदुर रेल्वे, (दि.14)- राज्यात 20 नोव्हेंबर रोजी एकाच टप्प्यात विधानसभा निवडणूक होऊ घातली आहे. या निवडणुकीदरम्यान धामणगाव रेल्वे विधानसभा क्षेत्रातील चांदुर रेल्वे स्विपने मतदार जनजागृती उपक्रमात तालुक्यातील आठवडी बाजाराचे गाव असलेले मालखेड येथे मंगळवारी आठवडी बाजारात वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मतदान टक्केवारी वाढवण्यासाठी व मतदान जनजागृतीसाठी स्वीपद्वारा मतदार जागृतीचे पत्रक वाटप केली. विविध नावीन्यपूर्ण उपक्रमाची आखणी करण्यात आली होती, यापूर्वी चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे व नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील विविध शाळांनी आकाश कंदीलद्वारे मतदार जनजागृती केली. धामणगाव रेल्वे विधानसभा स्वीप पथक प्रमुख नोडल अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे यांच्या नेतृत्वात हा उपक्रम पार पडला

जनजागृती महत्वाची : संदीप बोडखे

निवडणूक कार्यात दुर्लक्ष होऊ नये अशा उपक्रमाच्या माध्यमातून निवडणूक जनजागृती करण्याचे ठरविले आहे. स्वीप कक्ष मार्फत 19 तारखेपर्यंत अशा नावीन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून जनजागृती करणार असल्याचे धामणगाव विधानसभा क्षेत्राचे स्वीप पथक प्रमुख संदीप बोडखे यांनी सांगितले. गटविकास अधिकारी तेजश्री आवळे यांच्या मार्गदर्शनाखाली गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे यांच्या नेतृत्वात स्विप सदस्य सहाय्यक शिक्षक सुधीर केने, गटसमन्वयक मंगेश उल्हे, विषयतज्ञ श्रीनाथ वानखडे, प्रविण बोरकर, ग्रामविकास अधिकारी मदनगोपाल गवळी, प्रा.जितेंद्र चव्हाण, प्रा. जवंजाळ, श्रीकृष्ण पवार, भागचंद बमनेल, ऋषिकेश देशमुख आदी उपस्थित होते.

भारतीय संस्कृतीमध्ये नारी शक्तीचा दर्जा सर्वोच्च!

मध्यप्रदेश मुख्यमंत्री डॉ.मोहन यादव यांचे प्रतिपादन

महासागर प्रतिनिधी

चुरणी, (दि.14)- मध्यप्रदेशप्रमाणे महाराष्ट्राने सुद्धा लाडकी बहीण योजना लागू केली व महिलांना पंधराशे रुपये प्रमाणे महिलांच्या खात्यात जमा केले. ही अतिशय चांगली गोष्ट आहे. बहिणी हा पैसा जपून वापरतात व योग्य ठिकाणी खर्च करतात. बहिणींना दिलेले पैसे हे अतिशय योग्य असून भारतीय संस्कृतीमध्ये नारी शक्तीला सर्वोच्च दर्जा आहे. लाडली बहिण योजनेच्या माध्यमातून हा सन्मान केला जात आहे. असे प्रतिपादन मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ.मोहन यादव यांनी केले. ते चुरणी येथे गुरुवारी (दि.14) आयोजित प्रचारसभेदरम्यान बोलत होते. यावेळी मेळघाटातील जनता मोठ्या प्रमाणात उपस्थित होती. माजी आमदार केवळराम काळे, आमदार प्रभुदास भिलावेकर,राजा ठाकुर,राजा येवले,भैय्यालाल

मावस्कर, आप्पा पाटील,गजानन खडके, सदाशिव खडके, राजा पाटील, आलोक अलोकार, सुमीत चावरे यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी मंचावर उपस्थित होते.

मुख्यमंत्री यादव पुढे म्हणाले की, आपण भारत देशाला भारत माता असे म्हणतो यावरून हे स्पष्ट होते की आपल्या संस्कृतीमध्ये नारी शक्तीला अन्नसाधारण महत्त्व आहे म्हणून मध्यप्रदेश सरकार व त्यानंतर महाराष्ट्र सरकारने नारी शक्तीच्या सन्मानासाठी लाडकी बहीण योजना आणून भगिनींचा सन्मान केलेला आहे, हा सन्मान पुढेही व्हावा या दृष्टिकोनातून भाजपाचे सरकार येणे आवश्यक आहे. असेही मुख्यमंत्री यादव यावेळी म्हणाले. चुरणी येथे एका शेतामध्ये या सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेला मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते.

सनातन धर्माला जिवंत ठेवणारा पक्ष म्हणजे भाजप

चांदुर बाजार - शेकडो वर्षा पासून भारतात सुरु असलेली सनातन संस्कृती मिटविण्याचा घाट अनेकदा करण्यात आला. यात महाराष्ट्राचा भूमीत छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदुत्वाची पताका रोवली. आज या संस्कृतीला वाचविण्याचे काम महायुतिच्या भाजप तर्फे केले जात आहे. असे विधान

प्रचार सभेला आलेले मध्यप्रदेश चे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी केले. यावेळी मंचावर खा.अनिल बोंडे, भाजप चे तालुका अध्यक्ष मुरली माकोडे, सुधीर रसे, युवा स्वाभिमान चे तालुका अध्यक्ष पवन बैस, माजी नगरसेवक टिकू अहिर, अतुल रघुवंशी, माजी उपाध्यक्ष मनीष नांगलिया, अशोक बनसोड, प्रमोद कोरडे, राष्ट्रवादी काँग्रेस च्या सुरेखा ठाकरे, बैतुल चे आमदार चंद्रशेखर देशमुख सह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

बंद घरातून 3.19 लाख रुपयांचा माल लंपास

अमरावती - नागपुरीगेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मसानगंज स्थित गोंडाबाबा मंदिराजवळ राहणारे विशाल आनंद निधाने यांच्या घरातून चोराने 3 लाख 19 हजार रुपये किमंतीचा मुद्देमाल चोराने लंपास केला. ते घराला कुलूप लावून एका नातेवाईकाचा मृतदेह घेण्यासाठी भुसावळला गेला होता. दरम्यान, चोराने सिमेंटची खिडकी तोडून घरात प्रवेश करून कपाटातील 2 लाख 40 हजार रुपयांची रोकड व 79 हजार 250 रुपयांचे दागिने, असा एकूण 3 लाख 39 हजार 250 रुपयांचा माल चोरून नेला. विशाल निधाणे हे 13 नोव्हेंबर रोजी घरी परतले असता, विशाल निधाने यांच्या तक्रारीवरून नागपुरीगेट पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढिल तपास नागपूरी गेट पोलीस ठाण्याचे ठाणेदाराच्या मार्गदर्शनात पोलीस करीत आहे.

शक्ती महाराजांचा पप्पु पाटीलांना जाहीर पाठिंबा

हिंदुत्वाच्या मुद्दयावर घेतला निर्णय

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि.14)- हिंदुत्वाच्या समर्थनार्थ प्रखर व आक्रमक भूमिका घेणाऱ्या महाकाली मंदिराच्या शक्ती उर्फ पप्पू महाराज यांनी अमरावती मतदारसंघातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार पप्पु उर्फ मंगेश पाटील यांना गुरुवारी (दि.14) आपल्या समर्थकांसह जाहीर पाठींबा दिला.

अमरावती हिंदू स्मशानभूमी स्थित महाकाली मंदिराचे शक्ती उर्फ पप्पू महाराज हे हिंदुत्वाच्या मुद्दयावर प्रखर व आक्रमक भूमिका घेणारे व्यक्तिमत्व असून जिल्ह्यात त्यांना मानणाऱ्या समर्थकांची मोठी संख्या आहे. विशेष करून यामध्ये हिंदी भाषिकांचा समावेश असून या भक्तांवर त्यांचा मोठा पगडा आहे. शक्ती महाराज यांचा शब्द त्यांच्यासाठी प्रमाण असल्यामुळे ते जे भूमिका घेतील त्याला शिरोधार्य मानून त्यांचे भक्तगण व समर्थक कार्य करतात हे विशेष.

राज ठाकरे हिंदुत्वाचा खरा चेहरा

राज ठाकरे हेच देशातील सर्वात मोठा हिंदुत्वाचा चेहरा आहे. राजसाहेब ठाकरे यांनी हिंदुत्वावरून घेतलेली भूमिका अत्यंत स्पष्ट व योग्य असून हिंदूंचे हिंदुत्व सुरक्षित रहावे यासाठी आम्ही त्यांचे हात बळकट करित आहो. अमरावती मतदारसंघात मनसेचे उमेदवार पप्पू उर्फ मंगेश पाटील यांना जाहीर पाठिंबा घोषित करीत असल्याचे शक्ति महाराज यांनी सांगितले. शक्ती उर्फ पप्पू महाराज यांनी मनसे उमेदवार पप्पू पाटील यांची भेट घेत त्यांना समर्थनाचे पत्र देत विजयाचा आशीर्वाद दिला.

पप्पु पाटील यांना समर्थन दिल्याने हिंदुत्ववादी विचारसरणीचा एका मोठा मतदार मनसेच्या इंजिन ला च आपली पहिली पसंती देणार असल्याचे दिसत आहे. नुकतीच राज ठाकरे यांची अमरावतीमध्ये जाहीर सभा झाली होती, ज्यामध्ये त्यांनी आम्ही सत्तेत आल्यास मशिदीवरील भोंगे दिसणार नाही, असे आश्वासन जनतेला दिले होते. हिंदुत्ववादी हा मुद्दा या निवडणुकीत गेमचेंजर ठरणार असल्याचे दिसत आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

साधारण स्त्रीला तुम्ही वाघीण केले-प्रिती बंड

लक्षणीय ठरली पार्वती नगरातील सभा

महासागर प्रतिनिधी

अमरावती,(दि.14)- मला तिकीट मिळाले नाही, याचे दु:ख नाही, माझी तिकीट कापली याचे दु:ख आहे. आणि एक मोठे षडयंत्र रचून विद्यमान आमदाराने हा प्रकार केला. मी लढणार नव्हते. मी परिस्थितीला सरेंडर झाले होते, परंतू या साधारण स्त्री ला जनतेनी ताकद देवून वाघीण केले, त्यामूळे मी लढत असल्याचे उमेदवार प्रिती संजय बंड म्हणाल्या. त्या बुधवारी(दि.13) ला बडनेरा मतदारसंघातील पार्वती नगर येथे आयोजित एका सभेमध्ये बोलत होत्या.

यावेळी शिवसेनेचे माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील, आशिष धर्माळे, ऑटो युनियनचे अध्यक्ष नितीन मोहोड, नाना नागमोते, नितीन तारेकर, संजय शेटे, दिलीपराव बुथ यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

प्रिती बंड पुढे म्हणाल्या की, बडनेरा मतदारसंघात आमचे पोस्टर फाडल्या जात आहे, आमच्या स्टीकरवर स्टीकर चिटकविल्या जात आहे. हा सगळा पाहून मी या लोकांवर धावून गेले. ही ताकद या जनतेने मला दिली आहे. आम्ही विकल्या जात नाही, आम्ही झुकत नाही आणि थांबतही नाही, हे पाहून विरोधक कोमात गेले असल्याचे प्रिती बंड यांनी यावेळी सांगितले.

1 हजार रुपये हातावर ठेवताच अश्रु कोसळले!

प्रचार करित असताना एका लहानश्या घरातील मंडळीनी मला घरात बोलाविले. मी त्यांना सांगितले की, मला पदयात्रेला वेळ होईल, तरीही त्यांनी जबरदस्तीने घरात बोलाविले, मी आतमध्ये गेली आणि 1 हजार रुपये माझ्या हातावर ठेवत, मी ऐवढेच देवू शकतो, असे त्यांनी म्हटले. मी खूप प्रयत्न केला, पण अश्रुंना थांबवू शकले नाही. माझे अश्रु कोसळले. जनता किती प्रेम करते माझ्यावर, हे माझ्या गेल्या जन्मीचे पुण्य आणि संजय बंड या नावाची पुण्याई आहे. असेही प्रिती बंड म्हणाल्या.

हा सर्वपक्षीय उमेदवार आहे!

माजी आमदार धाने पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आम्ही प्रचाराला फिरत असताना लोकं आम्हाला घरात नेतात, चहा पाजतात, नंतर सांगतात, आम्ही काँग्रेसचे, कुणी म्हणतात आम्ही बसपाचे परंतू मत तुम्हालाच देवू! हे पाहून प्रिती बंड आता अपक्ष नसून सर्वपक्षीय उमेदवार झाल्या आहेत. मी माझ्या जीवनात अशी निवडणूक पाहीली नाही. सुदामकाका देशमुखांना जेवढं प्रेम जनतेचं मिळालं तेवढं प्रेम प्रितीताईंना मिळत आहे. विरोधक आता तुम्हाला भ्रमित करण्याचा प्रयत्न करतील. आम्ही त्यांचे तीन फोडले, धाने पाटील गायब होईल अश्या वावड्या उठवित आहे. हा धाने पाटील गायब होउन राणा च्या घरी जाईल का? हे त्यानेच सांगावे असा खोचक टोलाही यावेळी त्यांनी मारला.

सर्वसामान्यांचे नेतृत्व आहे प्रिती बंड-धर्माळे

यावेळी आशिष धर्माळे यांनी आपल्या भाषणात प्रिती बंड या सर्वसामान्यांचे नेतृत्व म्हणून पुढे आले असल्याचे सांगितले. समक्ष महिला म्हणून आज त्या बडनेरा मतदारसंघात लढत देत आहेत. आता निवडणूकीला कमी दिवस राहील्याने विरोधकांकडून टीका, टीपणी सुरु होईल. बबली ला आपण घरी बसविले, आता बंटीला घरी पाठवायचे आहे. हा उमेदवार शिवसेनेचा आहे. संजय बंड या नावाचे हे नेतृत्व आहे. गेल्या वेळेला आपल्याच लोकांनी माती खाल्ली, तरी आपण 75 हजार मते घेतली. यंदा ते आपल्या सोबत नाहीत, विजयश्री आपलाच राहील.

मत हे दुधारी तलवार आहे - अभिनेते गणेशपुरे

- मंगरूळ चव्हाळा, वाढोणा व लोणी टाकळी येथे जाहीर सभा
- डॉ.निलेश विश्वकर्मा यांना निवडून आणण्याचे केले आवाहन

महासागर प्रतिनिधी

नांदगाव खंडेश्वर, (दि.14) - गेल्या 60 वर्षापासून भाजप आणि काँग्रेस सत्ता भोगत आहे. त्यांच्या विरोधात आता पर्यंत कुणीही उभे राहण्याची हिमंत केली नाही, ती हिमंत माझा लहान भाऊ निलेश विश्वकर्मा यांनी केली आहे. मत हे दुधारी तलवार आहे, ते विचार पूर्वक चांगल्या उमेदवाराला द्या, कोण कामी पडेल ते ओळख असे आवाहन लोकप्रिय अभिनेते भारत गणेशपुरे यांनी बुधवारी नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील मंगरूळ चव्हाळा, वाढोणा रामनाथ, लोणी टाकळी येथील जाहीर सभेत नागरिकांना केले.

अमरावतीचे पुत्र अभिनेते भारत गणेशपुरे हे धामणगाव रेल्वे मतदारसंघातील उमेदवार डॉ.निलेश विश्वकर्मा यांच्या प्रचारार्थ नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील सभेत स्टार प्रचारक म्हणून आले होते, त्यावेळी ते बोलत होते.

अभिनेते गणेशपूरे पुढे म्हणाले की, धामणगाव रेल्वे मतदार संघातील नांदगाव खंडेश्वर तालुक्यात कुठल्याही प्रकारचा विकास झाला नाही. सत्ताधाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या नावावर लाख मोलाची मते घेतली, मात्र सोन्या सारख्या पिकाला माती मोल भाव दिला. तरुणांचे वय वाढत आहे, परंतू त्यांच्या हाताला कामं नाही, गरीबांच्या जीवाला महत्व राहिले नाही. आता या व्यवस्थेत बदल करण्याची वेळ आली आहे. आलटून-पालटून सत्ता भोगणाऱ्यांना इंगा दाखवा. असे आवाहन सिने अभिनेते भारत गणेशपुरे यांनी केले.

यांना सत्तेचा माज आहे-डॉ.विश्वकर्मा

वारंवार सत्तेत येणाऱ्या आजी-माजी आमदारांना सत्तेचा माज आला आहे, त्यामूळे ते शेतकऱ्यांवर तोंडसुख घ्यायला मागे नाही. शेतकरी दारू पितो म्हणून किडन्या गमावितो, 25 रुपयाचा खर्रा घेतल्याशिवाय महिला मजूर कामावर जात नाही. असे वक्तव्य करणे कितपत योग्य आहे. शाहू, फुले, आंबेडकर यांच्या नावावर मते मागतात, मात्र शेतकऱ्यांना शिव्या घालतात ही निवडणूक जाती, पातीची पक्षाची नाही, मतदान तुमच्या पिढीसाठी करायचे आहे. काँग्रेसवाले विधान परिषद निवडणुकीत मत विकतात व कोट्यावधी रुपये कमावितात. ज्या अजित पवारांनी 72 हजार कोटींचा घोटाळा केला, त्यांनाच भाजप सरकारने उपमुख्यमंत्री केले. विद्यमान आमदाराचा स्वीय सहायक, मेव्हणा व आक्का हा कंत्राटदारांकडून कमिशनचा टक्का घेण्यातच व्यस्त आहे. सामान्य लोकांची सेवा करण्यासाठी माझी उमेदवारी आहे. फक्त एक वेळा संधी देऊन बघा संधीचे सोने केल्याशिवाय राहणार नाही, असे आश्वासन डॉ.निलेश विश्वकर्मा यांनी सभेत दिले. यावेळी व्यासपीठावर डॉ.राज चौधरी, रोशन गाडेकर, डॉ.प्रकाश विश्वकर्मा, संतोष पांडे, जयकिरण इंगोले, ओंकार सानप, विशाल राउत यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

दुचाकी दुभाजकावर आदळली, दोघे ठार

अंजनगाव- परतवाडा मार्गावर अपघात

अंजनगाव सुर्जी - भरधाव असलेली दुचाकी दुभाजकावर आदळल्याने अपघात होऊन दोघांचा मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना बुधवार (दि.13) अंजनगाव सुर्जी-परतवाडा मार्गावरील महावितरणच्या उपकेंद्राजवळ घडली.

जयेश तेलगोटे (20) रा. शेंडगाव, ह. मु. विहिगाव व प्रणित तायडे (20) रा. विहिगाव अशी मृतांची नावे आहेत. जयेश व प्रणित हे दोघे दुचाकी क्रमांक एमएच 27 टीसी 202 ने भरधाव वेगाने परतवाडा मार्गाने अंजनगाव सुर्जीकडे येत होते. मार्गात महावितरणच्या उपकेंद्राजवळ दुचाकी चालकाचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे अनियंत्रित दुचाकी दुभाजकावर आदळली. अपघात झाल्याचे लक्षात आल्यावर रस्त्यालगतच्या दुकानदारांनी तेथे धाव घेत रुग्णसेवक मुन्ना इसोकार व सहकाऱ्यांना माहिती दिली. अपघातात गंभीर जखमी झालेल्या जयेश व प्रणितला ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे डॉक्टरांनी जयेशला मृत घोषित केले. तर प्रणितला अचलपूर उपजिल्हा रुग्णालय व तेथून जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, वाटेतच त्याचीही प्राणज्योत मालवली. या घटनेने विहीगावात हळहळ व्यक्त होत आहे. अंजनगाव सुर्जी पोलिसांनी अपघाताची नोंद घेतली आहे.

बच्चू कडूंच्या अभूतपूर्व प्रचार रॅलीने भरला विजयाचा हुंकार

व्यापारी वर्ग, नागरिकांनी केले जल्लोषात स्वागत

महासागर प्रतिनिधी

अचलपूर, (दि. 14)- महाराष्ट्राच्या राजकारणातील विचारणीय आणि कर्तबगार नेतृत्व समजले जाणारे बच्चू कडू हे पाचव्यांदा निवडणूक रिंगणात असून परिवर्तन महाशक्तीच्या वतीने अचलपूर विधानसभा मतदार संघात त्यांच्या प्रचाराची मुसंडी मारलेली आहे. बुधवारी बच्चू कडू यांची अचलपूर, परतवाडा येथे अभूतपूर्व प्रचार रॅली पार पडली असून या रॅलीने सर्व विक्रम मोडीत काढत विजयाचा हुंकार भरला आहे. यावेळी परतवाडा व अचलपूर मधील व्यापारी वर्ग, नागरिकांनी बच्चू कडू यांचे जल्लोषात स्वागत केले.

बच्चू कडू यांचे ठिकठिकाणी नागरिकांनी स्वागत करून त्यांच्यावर फुलांचा वर्षाव केला. घरोघरी महिला भगिनींनी बच्चू कडू यांचे औक्षवण करत त्यांना ओवाळले. अचलपूर आणि परतवाडा मधील लाडक्या बहिणींनी आपण तुमच्या पाठीशी असून आपला विजय निश्चित असल्याची प्रतिक्रिया बच्चू कडू यांना दिली. ही प्रचार रॅली मेन रोड, दुरानी चौक, सदर बाजार, मिश्रा लाइन, गुजरी बाजार, वकील लाइन, तिलक चौक श्रीनिवास मार्गावरून घरोघरी जात महिला, भगिनी, वृद्ध माता पिता, दिव्यांग बांधवांचे आशीर्वाद घेतले. प्रहार कार्यकर्ते तसेच बच्चू कडू यांच्या समर्थकांनी या रॅलीचे आयोजन केले होते. सदर बाजार परिसरातील बच्चू कडू यांच्या रॅलीने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले होते. त्यांनतर मुगलाईपुरा, कैकाडीपुरा, पेन्शनपुरा, मोमीनपुरा याठिकाणी बच्चू कडू यांची जाहीरसभा पार पडली.

यावेळी मनोज नंदवंशी, पंकज डेरे, रम्मी महाराज, गोपाल शर्मा, सतीश व्यास, अप्पू तिवारी, प्रवीण चौधरी, संतोष नरेडी, मुकुंद अग्रवाल, संजय जैस्वाल, लल्ला बंसल, बल्लू जवंजाळ, पदम जैन, रवि अग्रवाल, अंकित अग्रवाल, भावेश अग्रवाल, डॉ दीपक गुल्हाने, स्वदीप शेळके, ऋषिकेश अतकरे, सर्वेश कडू, सतीश काळबांडे यांचेसह असंख्य कार्यकर्ते, व्यापारीवर्ग, नागरिक, युवा वर्ग बहुसंख्येने उपस्थित होते.

आपली साथ माझी ताकद-बच्चू कडू

पंचवीस वर्षांपासून समाजकारण आणि राजकारणात आहे. मात्र आपली मोलाची साथ माझी ताकद असल्याचे प्रतिपादन यावेळी बच्चू कडू यांनी केले. चार वेळा आमदार करण्यात आपली भूमिका महत्वाची ठरली. आपल्या मतांचा मी सदैव आदर केला आणि त्या आधारेच मी गोरगरीब, दिव्यांग, कामगार, शेतकरी बांधवांचे प्रश्न विधानसभेत मांडून त्यांना न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. ही लढाई संघर्ष आणि स्वाभिमानाची असून आपण यावेळी सुद्धा माझ्यावर विश्वास टाकून मला सेवेची संधी द्यावी अशी विनंती बच्चू कडू यांनी उपस्थितांना केली.

देवेंद्र भूयारांच्या प्रचारासाठी लाडक्या बहिणी मैदानात!

पत्नी डॉ.मोनाली भुयारांनीही सांभाळली प्रचाराची धुरा

महासागर प्रतिनिधी

वरुड, (दि.14)- लाडक्या बहिणींच्या कुटूंबाला योजनेच्या माध्यमातून हातभार लावणाऱ्या महायुतीच्या पाठीमागे ठाम उभ्या राहत लाडक्या बहिणी निवडणूकीच्या प्रचारात उतरल्या आहेत. मोर्शी-वरुड विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे उमेदवार देवेंद्र भुयार यांच्या अर्धांगिनी डॉ. मोनाली भुयार, आपल्या पतींच्या प्रचाराकरिता निवडणुकीच्या रिंगणातील उतरल्या आहेत. त्यांचे हात बळकट करण्याकरिता त्या अनेक गावात त्या आपल्या प्रचाराची घोडदौड करित आहे.

आयुष्यभर एकमेकांना साथ देण्याच्या अनाभाका घेत असलेली पत्नी जेव्हा पतीच्या प्रचारासाठी पुढे सरसावत मैदानात उतरते तेव्हा त्या महिलेच्या असीम प्रेमाचा व शक्तीचा परिचय येतो, असे बोलल्या जाते. डॉ.मोनाली भूयार यांनी पदर खोचून स्वत:ला निवडणुकीच्या प्रचारात झोकून दिले आहे. घरी दोन वर्षाचे बाळ असताना देखील त्याची परवा न करता पतीला पुन्हा विधानसभेमध्ये पाठविण्यासाठी त्यांनी जणु काही शपथ घेतली की, काय असे दिसत आहे. घड्याळीचा प्रचार करित डॉ.मोनाली भूयार यांनी संपूर्ण वरुड-मोर्शी विधानसभा मतदारसंघ पिंजून काढला आहे. वैदयकीय क्षेत्रातील असलेल्या मोनाली भुयार यांनी अत्यंत कमी वेळात प्रचाराचे नियोजन अत्यंत योग्यरित्या हाताळले आहे.

लाडक्या बहिणींचे नेतृत्व

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांना एकत्र करीत मोनाली भुयार यांनी एक रणनीती आखून त्याप्रमाणे शिस्तबद्ध प्रचार सुरू केला आहे. सकाळ, दुपार, सायंकाळचे तीन टप्प्यात महिला शक्ती सोबत घेऊन मोनाली भुयार ह्या डोअर-टू-डोअर प्रचार करीत आहेत. मोनाली भुयार यांच्या नेतृत्वातील लाडक्या बहिणींची टीम प्रत्येक नगरात व प्रत्येक गल्लीतील मतदारांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी व समस्या जाणून घेत आहे. या सर्व बाबी मार्गी लावण्यासाठी पुन्हा एकदा पती देवेंद्र भुयाराना संधी देण्याचे आवाहन देखील त्या करित आहेत.

जाहिर नोटीस

अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथील (श्री. एस.एम. जाधव) दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र. ५४४/२०२४ **ने.ता. १२/१२/२०२४**

शारदा अरूण दामले वय ५३ वर्षे धंदा - घरकाम
रा. कसबेगव्हाण ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती .... अर्जदार

विरूद्ध

निरंक ..... गैरअर्जदार

ज्याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे आजोबा नामे किसनराव मनाजी पडघामोल यांचा दिनांक ०२/०९/१९८५ रोजी मृत्यू झाला आहे. तसेच अर्जदाराची आजी नामे जनाबाई किसन पडघामोल यांचा दिनांक ३१/०८/२००३ रोजी मृत्यू झाला आहे. तसेच अर्जदाराचे मामा नामे शामराव किसनराव पडघामोल यांचा दिनांक २४/०९/२०२३ रोजी मृत्यू झाला आहे. तसेच अर्जदाराची आई नामे सोनुताई रामराव देवडेकर यांचा दिनांक २८/०१/२०२२ रोजी मृत्यू झाला आहे. तसेच अर्जदाराचे वडील रामराव अमृतराव देवडेकर हे बरेच वर्षापूर्वी मरण पावले आहेत. तसेच अर्जदाराची मावशी नामे चंद्रकला पांडूरंग सिरसाट यांचा दिनांक ०५/०३/२०२३ रोजी मृत्यू झाला आहे. तसेच अर्जदाराचे मावशे नामे पांडूरंग बबन सिरसाट यांचा बऱ्याच वर्षापूर्वी झाला आहे. अर्जात नमूद केल्याप्रमाणे यांचे वारस खालील प्रमाणे आहेत. १. ओमकार किसनराव पडघामोड वय ७२ वर्षे मुलगा, २. अरूण किसन पडघामोड वय ६३ वर्षे मुलगा, ३. शामराव किसन पडघामोड मयत मुलगा, अ. सुशीला शामराव पडघामोड वय ५९ वर्षे सुन, ब. सहदेव शामराव पडघामोड वय ३८ वर्षे नातू, क. चंद्रकांत शामराव पडघामोड, वय ३६ वर्षे नातू, ४. सोनुताई रामराव देवडेकर मयत मुलगी, अ. शारदा अरूण दामले वय ५३ वर्षे नात, ५. चंद्रकला पांडूरंग सिरसाट मयत मुलगी, अ. सुरेश पांडूरंग सिरसाट वय ५३ वर्षे नातु, ब. भारत पांडूरंगजी सिरसाट वय ४४ वर्षे नातू, ब. नलु तुळशिरदास तायडे वय ५६ वर्षे नात.

या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

किसनराव मनाजी पडघामोल, जनाबाई किसन पडघामोल हे मरण पावल्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (१८२७) चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध तारखेपासून एक महिण्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणाचाही आक्षेप, हरकत नाही, असे गृहित धरून अर्जावर सुनावणी करून अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २३/१०/२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर, अंजनगांव सुर्जी
जि. अमरावती

जाहिर सुचना

माझे अशील श्री राजकुमार लधाराम ओतवानी यांची खालील मिळकतीचे मुळ बक्षिसपत्र/खरेदी खत दि. २५-०४-२०१६ र.द.क्र १४६१ हे गहाळ झाले असून कोणास या बाबत माहिती असल्यास किंवा कोणास सापडली असल्या किंवा कठे गहाण असल्यास त्यांनी खालील पत्यावर कळविणे किंवा आणुन देणे.

याद्वारे सर्वास कळविण्यात येते की, या मिळकती बाबत वरिल दस्ताऐवज ला घेऊन कोणतेही व्यवहार करू नये व केल्यास माझे अशील होणाऱ्या नुकसानास जबाबदार राहणार नाही व त्यांच्यावर कुठलही बंधन राहणार नाही.

वरील मिळकती खरेदी संदर्भात कुठलीही आक्षेप/माहिती ७ दिवसात प्राप्त झाली नाही तर माझे अशील सदर मिळकतीचे दस्त गहाळ झाले असे समजून पुढिल कार्यवाही करतील याची नोंद घ्यावी.

मिळकतचे वर्णन

सदर मिळकत ही अमरावती व दु.नि. अमरावती यांच्या अधिकारा खालील येत असून, याचा शे.स.क्र. ४५८/१, ४५८/२, ४५९, ४६०/१, ४६०/२, ४६०/३, ४६१/२, ४६३/१ए/२, ४६३/१ए/३, ४६३/१सी, ४६४/१, ४६४/२, ४६४/३ प्लॉट क्र. ७९८, गाळा क्र. ०-११, ०-१२, ०-१३, ०-१४ यांचे क्षेत्र क्षेत्रफळ ३०७.२ चौ.मी. मौजे बोरगांव धर्माळे प्रगणे नांदगांव पेठ ता. अमरावती, जि. अमरावती यांची चर्तु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्वेस :- रोड, पश्चिमेस :- रोड, उत्तरेस :- गाळा क्र. ०-९, ०-१०, दक्षिणेस :- गाळा क्र. ०-१५, ०-१६

शिक्का

पत्ता - ॲड. वैभव न. काकिर्डे ॲन्ड,
१९, हरिओम कॉलनी, संताजी नगर,
अमरावती- ९०७३८२१००१